महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र. कशिप्र-१४२५/प्र.क्र.१०/अतिरीक्त मॉप अप सूचना/ २८७९ / २०२५ दि.११ सप्टेंबर २०२५

## (शै. व. २०२५-२६ मधील दृष्यकला पदवी अभ्यासक्रमासाठी केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया तथा मॉप अप फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा भरणेसाठी सुचना)

दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी सामाईक प्रवेश प्रक्रियेअंतर्गत द्वितीय कॅप फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा भरणेसाठी दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी कला संचालनालयाच्या अधिपत्याखाली मॉप अप तथा अतिरीक्त कॅप फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर फेरीनंतर शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपुर तसेच इतर खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागा भरणेसाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येत असुन सदर प्रक्रियेत दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर दिनांक २५ जुलै २०२५ व दि.२२ ऑगस्ट २०२५ रोजी प्रदर्शित झालेल्या गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार **(सामाईक प्रवेश प्रक्रियेतुन कोठेही प्रवेशित नसलेले)** पात्र असतील.

सदरील प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० ते १३ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर १)शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर २)शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपुर ३)इतर सर्व खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालय **यांसाठी वेगवेगळे** किंवा उक्त तीनही ज्यामध्ये शासकीय तथा खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी **एकत्रित** ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. तदनंतर दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०४.०० वाजता शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपुर तसेच इतर खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयांमधील कॅप अगेंस्ट व्हॅकन्सी साठी स्वतंत्र गुणवत्ता याद्या राज्य सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

सदर गुणवत्ता यादीतील समाविष्ट उमेदवार त्यांच्या पसंतीनुसार प्रवेशासाठी इच्छुक महाविद्यालयात दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करतील.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य. मुंबई**